।। बहुजन हिताय । बहुजन सुखाय ।।

४० वर्षापासून नियमितपणे प्रकाशित होणारे जनसामान्यांच्या प्रश्नांचा ध्यास असणारे एकमेव निर्भिड...

४१

साप्ताहिक माणदेश वार्ता

संस्थापक संपादक :
स्व.मारूती शिवाजी सोनवणे (एम.ए.)

स्थापना
६ नोव्हेंबर १९८३

RNI NO. MAH/MAR/2004/16467

POSTAL REGD. L2/RNP/PPR/04/2024-2026

FACEBOOK MANDESH VARTA

सांगोला * जुने वर्ष ४१ वे नवीन वर्ष २१ वे * रविवार दि. २४ मार्च २०२४ * पाने ४ * मूल्य १ ₹ * अंक ११ वा

# सांगोला तालुक्यातील कोळा येथे दोघांचा खून

## दोन खुनाच्या घटनेमुळे सांगोला तालुक्यातील कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न चवट्या वर








सांगोला : कोळे (ता. सांगोला) येथे दोन गटात चाकू धारदार शस्त्र, काठी, लाकडी फळीने केलेल्या जबर मारहाणीत दोघांचा खून झाला, तर दोन्ही गटातील चौघेजण गंभीर जखमी झाले आहेत. दोन खुनाच्या घटनेमुळे संपूर्ण सांगोला तालुका हादरून गेला असून, तालुक्यात कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न चवट्यावर आलेला आहे.

अज्ञात कारणावरून सहाजणांनी संगणमत करून चाकूने पोटात भोसकून एकाचा खून केला तर एकास पोटात भोसकून गंभीर जखमी केले तर दुस–या घटनेत दुचाकीला कट मारल्याच्या कारणावरून सहाजणांनी लाकडी फळीने व हाताने लाथाबुक्क्यांनी केलेल्या हाणामारीत एकाचा खून

केला तर तिघेजण गंभीर जखमी झाले. जखमीपैकी एकाची प्रकृती चिंताजनक असल्याने त्याच्यावर मिरज येथील शासकीय रुग्णालयात उपचार सुरू आहेत. ही घटना शुक्रवारी रात्री कोळे (ता. सांगोला) येथे घडली. बाळू शामराव आलदर (रा. संत तुकाराम नगर, आलदर वस्ती कोळे ता. सांगोला) व सुरज उर्फ बंड्या रमेश मोरे (वय ३१, रा. आंबेडकर नगर, कोळे ता. सांगोला) असे खून झालेल्या दोघांची नावे आहेत. याबाबत, कुंडलिक महादेव आलदर व विकास महादेव मोरे यांनी पोलिसात परस्परविरोधी फिर्याद दिली असून, पोलिसांनी १२ लोकांविरुद्ध खूनाचा गुन्हा दाखल केला. या घटनेत दोघांना अटक केली असून चौघांना संशयावरून ताब्यात घेतले आहे.

दरम्यान घटनेची माहिती मिळताच पोलीस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे, मंगळवेढा उपविभागीय पोलीस अधिकारी विक्रांत गायकवाड, पोलीस निरीक्षक भीमराव खंणदाळे यांनी पोलीस अधिकारी कर्मचारी समवेत घटनास्थळी भेट देऊन घटनेची माहिती घेवून ग्रामस्थांना शांततेचे आवाहन केले आहे.

अशा प्रकारे दोघांचे खून लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर झाल्याने कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

# सांगोला नगरपरिषदेची धडक कारवाई

## थकबाकीदारांचे गाळे व मालमत्ता केल्या सील

सांगोला : सांगोला नगरपरिषदेमार्फत मागील दोन महिन्यांपासून कर वसुलीसाठी विशेष वसुली मोहीम हाती घेण्यात आली आहे. या विशेष वसुली मोहिमे अंतर्गत थकबाकीदारांना भाडे व कराच्या रक्कमा भरणेबाबत नियुक्त अधिकारी व कर्मचारी यांचेमार्फत वारंवार सूचना देण्यात येत आहेत. परंतु तरीदेखील थकीत भाडे व कराच्या रक्कमा भरणा न झालेने मुख्याधिकारी डॉ. सुधीर गवळी यांचे मार्गदर्शनाखाली नगरपरिषद मालकीचे एकूण ७ गाळे थकीत भाडे व कराच्या रकमेपोटी सिल करण्यात आले.

स्थानिक स्वराज्य संस्थांचे उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीने विशेष वसुली मोहीम राबविण्याबाबत नगरपरिषद प्रशासन संचालनालयाकडून वारंवार आढावा व सूचना देण्यात येत आहेत. याचाच एक भाग म्हणून नगरपरिषद मालकीचे गाळे सील करण्यात आले.



सदरची कारवाई मुख्याधिकारी डॉ. सुधीर गवळी यांचे मार्गदर्शनाखाली कार्या. अधीक्षक श्री.स्वप्निल हाके, लेखापाल श्री.धनाजी साळुंखे, सतीश बनसोडे, अश्वजित माने, अनिकेत चंदनशिवे, संजय गावडे, आनंद हुलजंतीकर, शरद चव्हाण, संतोष ठोकळे, योगेश रसाळ, संतोष जांगळे व रमेश मोरे यांच्या उपस्थितित करण्यात आली.

थकबाकी रकमांच्या वसुलीसाठी नगरपरिषदेकडून वारंवार सूचना देऊनही थकबाकीच्या रकमा न भरणाऱ्यांकडील मालमत्ता सिल करण्यात येणार आहेत. तरी सर्व मालमत्ताधारकानी लवकरात लवकर कर भरणा करून नगरपरिषदेस सहकार्य करावे व कटू कारवाई टाळावी असे आवाहन मुख्याधिकारी डॉ.सुधीर गवळी यांनी केले आहे.

# संपादकीय......

जुने वर्ष-४१ वे
अंक-१८ वा

## सिल्क्यरा बोगदा नवयुग अभियांत्रिकी कंपनी कडून भाजपला निवडणूक रोखे

कंपनीला २६ ऑक्टोबर २०१८ रोजी केंद्राच्या आयटी छाप्यांचा सामना करावा लागला. सहा महिन्यांनंतर नवयुग अभियांत्रिकीने भाजपसाठी ३० कोटी रुपयांचे निवडणूक रोखे खरेदी केले.

हैदराबाद स्थित नवयुग अभियांत्रिकी कंपनी लिमिटेडने ५५ कोटी रुपयांचे निवडणूक रोखे विकत घेतले आहेत, आणि प्रत्येक एक भारतीय जनता पक्षाने रिडीम केला आहे.नवयुग अभियांत्रिकी कंपनी लिमिटेड स्वतःला ''नवयुग समुहाची प्रमुख कंपनी, ही एक अभियांत्रिकी आणि मुख्य पायाभूत सुविधा देणारी कंपनी आहे जिने उद्योगात स्वत:साठी एक मजबूत स्थान निर्माण केले आहे'' अशी व्याख्या केली आहे.ही तीच अभियांत्रिकी कंपनी आहे जी अलीकडे उत्तराखंडमध्ये सिल्कियारा-बरकोट बोगदा कोसळली तेव्हा १६ दिवसांपर्यंत ४१ मजूर अडकले होते, जोपर्यंत त्यांना उंदीर-खाण कामगारांनी हाताने बाहेर काढले होते. सिल्क्यरा बोगदा हा मोदी सरकारच्या चार धाम सर्व-हवामान सुलभता प्रकल्पाचा एक भाग आहे. २020 च्या मध्यात, नवयुगला सरकारच्या महत्त्वाकांक्षी ऋषिकेश-कर्णप्रयाग रेल्वे लिंक प्रकल्पालाही मान्यता देण्यात आली. त्याच्या वेबसाइटनुसार, पीर पंजाल खिंडीतून उत्तर काश्मीरशी सर्व-हवामान कनेक्टिव्हिटी सुनिश्चित करण्यासाठी गंगावरील पूल, काझीगुंड ते बनिहाल हायवे प्रकल्प यासह अनेक मोठ्या आणि प्रतिष्ठित प्रकल्पांसाठी ते जबाबदार आहे. ब्रह्मपुत्रा नदीवर धोला-सादिया पूलही बांधला आहे, ज्याचे पंतप्रधान मोदींनी २०१७ मध्ये उद्घाटन केले होते.नागपूर-मुंबई समृद्धी द्रुतगती महामार्गाच्या कामासाठी जबाबदार असलेल्यांपैकी हे देखील होते, ज्यांच्या एक्सप्रेसवेच्या पहिल्या टप्प्याचे मोदींनी डिसेंबर २०२२ मध्ये उद्घाटन केले होते.ऑक्टोबर २०१८ मध्ये आयटी छापे आणि सत्ताबदलाचा त्रास,२६ ऑक्टोबर २०१८ रोजी नवी दिल्लीतील आयकर अधिकाऱ्यांच्या २० सदस्यीय पथकाने नवयुगावर छापा टाकला. त्यावर आयकर नियमांचे उल्लंघन आणि मनी लॉंड्रिंगचा आरोप होता.सहा महिन्यांनंतर, कंपनीने १८ एप्रिल २०१९ रोजी ३० कोटी रुपयांचे निवडणूक रोखे खरेदी केले. भाजपने हे सर्व बाँड सोडवले.२०१९ मध्ये आंध्र प्रदेशात सरकार बदलले. त्याच वर्षी २२ ऑक्टोबर रोजी, तेलगू देसम पक्षाकडून सरकार बदलल्यानंतर कंपनीला कमीतकमी ''तीन धक्क्यांचा'' सामना करावा लागला. यामध्ये मोठ्या पोलावरम धरण प्रकल्पाला बसलेला झटका.

टीडीपीचे चंद्राबाबू नायडू मुख्यमंत्री असताना २०१७ मध्ये नवयुगाचे कंत्राट मिळाले होते. परंतु जगन रेड्डी सत्तेवर आल्यानंतर, नवयुग हा प्रकल्प काढून घेण्यात आला, हा निर्णय आंध्र प्रदेश उच्च न्यायालयाने २२ ऑक्टोबर २०१९ रोजी कायम ठेवला.

१० ऑक्टोबर २०१९ रोजी, योगायोगाने, नवयुगने १५ कोटी रुपयांचे निवडणूक रोखे विकत घेतले. हे सर्व भाजपमध्ये गेले.राज्यात टीडीपीची सत्ता असताना नवयुग समुहाच्या कंपनीकडे गेलेल्या आंध्र प्रदेशातील कृष्णपट्टणम पोर्ट कंपनीवर अदानी समूहाचा अनेक वर्षांपासून डोळा होता, असे बातम्या येत आहेत. पण काळानुसार गोष्टी बदलल्या. अदानीने पुन्हा एकदा नशीब आजमावले आणि २0२१ मध्ये ते यशस्वीपणे मिळवले.१० ऑक्टोबर २०२२ रोजी, नवयुगाने आणखी १० कोटी रुपयांचे रोखे खरेदी केले. पुन्हा बंध भाजपकडे गेले.अलीकडे, उंदीर-खाण कामगारांनी कामगारांना वाचवण्याच्या त्यांच्या कष्टकरी प्रयत्नांची प्रशंसा केली.

## व्यंगचित्रे




-महादेव साने,मलकापूर ता.कराड जि.सातारा

## सुविचार

ज्याप्रमाणे हिऱ्याला घालसल्याशिवाय चकाकी येत नाही,
त्याचप्रमाणे जीवनात येणाऱ्या संकटांशिवाय माणूस परिपक्व होत नाही.

## धर्म उत्सव

### होळी दहन

रविवार, २४ मार्च (फाल्गुन पौर्णिमा) रात्री होणार आहे. दुसऱ्या दिवशी म्हणजेच २५ मार्चला होळी खेळली जाईल. होलिका दहनाच्या वेळी प्रज्वलित होळीला अन्न आणि पूजेचे साहित्य अर्पण केले जातेहोलिका अग्नी हे यज्ञाचे प्रतीक असून होळीच्या दिवशी अग्नी हे त्यागाचे प्रतीक मानले जाते. यज्ञात विविध खाद्यपदार्थ, पूजेचे साहित्य त्याग केला जातो, त्याचप्रमाणे होळी दहनातही यज्ञ केला जातो.

होळीत आहुती का दिली जाते?पुराणानुसार, जीवनासाठी आवश्यक असलेल्या सर्व गोष्टी आपल्याला निसर्गाकडून मिळतात आणि निसर्गाकडून जे काही मिळते, त्या वस्तू देवाला अर्पण करून आपण आपली कृतज्ञता व्यक्त करतो. होळीच्या काळात गहू, हरभरा आणि इतर अनेक पिके पिकतात. कापणी साजरी करण्याची परंपरा आहे. प्राचीन काळापासून पीक पिकल्यावर होळी जाळून साजरी केली जाते, होळी जाळणे हा आहुती मानला जातो आणि देवाला नवीन अन्न अर्पण केले जाते.

रविवारी होलिका दहन तंत्र साधनेसाठी खूप खास असून रविवारी जेव्हा होलिका दहन होते तेव्हा ही रात्र तंत्र साधनेसाठी खूप खास असते. होलिका दहनाच्या रात्री तंत्र भक्त त्यांच्या आवडत्या देवतेची विशेष पूजा करतात.



गुरूंच्या मंत्रांचा जप करावा. रात्री जागृत राहून तपश्चर्या आणि ध्यान केले जाते.

फाल्गुन पौर्णिमेला पितरांसाठी श्राद्ध विधी करणे आवश्यक आहे. या तिथीला केलेले श्राद्ध, तर्पण, धूप आणि ध्यान केल्याने घराण्याचे पूर्वज खूप प्रसन्न होतात असे मानले जाते. कुटुंबातील मृत सदस्यांना पूर्वज देवता म्हणतात. या दिवशी गरजू लोकांना पैसे आणि धान्य दान करावे.

भविष्य पुराणानुसार, नारदजींच्या सांगण्यावरून युधिष्ठिराने फाल्गुन पौर्णिमेला अनेक कैद्यांना अभयदान दिले. कैद्यांची सुटका केल्यानंतर शेणाच्या गोवऱ्या जाळून होळी साजरी करण्यात आली.

साप्ताहिक माणदेश वार्ता हे साप्ताहिक मालक, प्रकाशक, संपादक सोनवणे रोहित मारूती यांनी मुद्रक माळी अशोक बाळकृष्ण यांच्या बाळकृष्ण ऑफसेट प्रिंटर्स,नेहरू चौक, कोर्टा जवळ, सांगोला, जि. सोलापूर येथे छापून १२७९ अ भारत गल्ली, सांगोला, जि.सोलापूर येथे प्रसिद्ध केले. E-Mail- mandesh_varta@rediffmail.com
संपादक : सोनवणे रोहित मारूती (या अंकातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.) . मो. ९४२०६६६५०१, ९०२८५९१४३१

# सांगोला नगरपरिषदेच्या वतीने बचत गटातील महिलांसाठी उद्योजकता विकास कार्यक्रम संपन्न



सांगोला : सांगोला नगरपरिषदे अंतर्गत राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान केंद्र पुरस्कृत योजना कार्यरत आहे. या योजनेच्या माध्यमातून शहरी गरीब नागरिकांचे जीवनमान उंचाविण्याचे काम केले जाते. सदर योजनेच्या अंतर्गत सांगोला शहरांमध्ये २०० पेक्षा जास्त बचत गटांची स्थापना करण्यात आलेले आहे. सदर बचत गटातील महिलांना उद्योग व्यवसाय विषयी माहिती देऊन आर्थिक सक्षमीकरण करण्यासाठी सांगोला नगरपरिषदेचे मुख्याधिकारी तथा प्रशासक डॉ. सुधीर गवळी यांच्या मार्गदर्शनाखाली दिनांक १२ मार्च ते १४ मार्च २०२४ असे तीन दिवसीय उद्योजकता विकास कार्यक्रमाचे आयोजन सांगोला नगरपरिषद सभागृह येथे करण्यात आले होते.

या कार्यक्रमांमध्ये महिलांना विविध व्यवसायासंबंधी माहिती, उत्पादित वस्तूंच्या विक्रि करिता बाजारपेठेचा अभ्यास, विविध मशिनरी, लेबलिंग, पॅकेजिंग व विविध शासकीय योजनांची माहिती संबंधित तज्ज्ञांच्या माध्यमातून देण्यात आली. या उद्योजकता विकास कार्यक्रमास श्री श्रावण रावणकुळे, बँक ऑफ महाराष्ट्राचे व्यवस्थापक श्री दीपक गवळी, महाराष्ट्र ग्रामीण जीवनोन्नती अभियानाचे व्यवस्थापक श्री कुणाल पाटील इत्यादी प्रमुख प्रशिक्षकांनी मार्गदर्शन केले.

सदर प्रशिक्षण यशस्वी पूर्ण करणाऱ्या सर्व प्रशिक्षणार्थ्यांना मुख्याधिकारी तथा प्रशासक डॉ. सुधीर गवळी यांच्या हस्ते प्रमाणपत्र वाटप करण्यात आले.यावेळी कर्तव्ये शहर स्तर संघाच्या अध्यक्ष सौ सुनंदा घोंगडे या उपस्थित होत्या. सदर कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन श्री स्वप्निल हाके, कार्यालयीन अधीक्षक, योगेश गंगाधरे, सहाय्यक प्रकल्प अधिकारी, बिराप्पा हाके, समुदाय संघटक यांनी केले.

बचत गटातील महिलांकरिता विविध उद्योगाच्या माध्यमातून आर्थिक सक्षमीकरण करण्याकरिता नगरपरिषदेने हे तीन दिवसीय उद्योजकता विकास कार्यक्रमाचे आयोजन केले होते. याचा निश्चितच बचत गटातील सर्व महिलांना लाभ होईल,असे यावेळी मुख्याधिकारी डॉ. सुधीर गवळी म्हणाले.

## सह्याद्री फार्मसी कॉलेजमध्ये जागतिक जल दिन उत्साहात साजरा



सांगोला : दरवर्षी २२ मार्च हा दिवस जागतिक जल दिन म्हणून साजरा करतो. या वर्षायाच्या जल दिनाची थीम शांततेसाठी पाणी हि आहे.पाणी जपून वापरणे आणि पाण्याची जास्तीत जास्त बचत करण्याला समर्थन करणे हे या दिनाचे उद्दिष्ट आहे .सह्याद्री कॉलेज ऑफ फार्मसी,मेथवडे या महाविद्यालयात जागतिक जल दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमात डॉ.ए.एम.तांबोळी ,प्रा.पी.एम.आडत व तृतीय वर्ष बी.फार्मसीची विद्यार्थिनी कु.वैष्णवी उन्हाळे यांनी आपल्या मनोगतात पाणी हे सर्वांसाठी अत्यंत गरजेचे आहे.आपल्या जीवनात म्हणूनच पाण्याचे महत्व मोठे आहे. वाढत्या औद्योगिकीकरणामुळे, सर्व नैसर्गिक स्त्रोतांचा अतिवापर आणि शोषणामुळे मानवाला पाण्याच्या तीव्र टंचाईला तोंड द्यावे लागत आहे.हे संकट भविष्यात आणखी वाढू शकते. पाणी हा सर्व सजीवांच्या अस्तित्वाचा एक महत्त्वाचा घटक असल्याने, पाण्याचा जपून वापर करून त्याचे संधारण करणे गरजेचे आहे असे मत व्यक्त केले.

या कार्यक्रमास महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.मनोजकुमार पाटील,सर्व प्राध्यापकवृंद,विद्यार्थी यांची उपस्थिती होती. या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन प्रा.पी.एम.आडत यांनी केले.

## बी.सी.ए. प्रवेशासाठी महाराष्ट्र शासनाची सी.ई.टी. परीक्षा देणे बंधनकारक

सांगोला : शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून बी.सी.ए. कोर्ससाठी प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी महाराष्ट्र शासनाची उएढ परीक्षा देणे आवश्यक आहे. चालू शैक्षणिक वर्षापासून बी.सी.ए/ बी.बी.ए./ बी.एम.एस./ बी.बी.एम.या अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षाच्या ज्या विद्यार्थ्यांना प्रवेश घ्यावयाचा आहे त्या विद्यार्थ्यांनी राज्य सरकारची प्रवेश पूर्व परीक्षा देणे बंधनकारक आहे. सदर अभ्यासक्रमाच्या प्रवेश पूर्व परीक्षेचे अर्ज भरण्याची ऑनलाईन प्रक्रिया सुरु झाल्याची माहिती संगणक विभागाचे प्रमुख प्रा.डॉ. राजकुमार ताठे यांनी दिली. सदर ऑनलाईन अर्ज दिनांक २१/०३/ २०२४ ते ११/४/२०२४ पर्यंत महाराष्ट्र राज्य शासनाच्या www.mahacet.org या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. अभ्यासक्रमास एच.एस.सी. व एच.सी. समकक्ष शिक्षण घेतलेले विद्यार्थी पात्र आहेत. प्रवेश पूर्व परीक्षेसाठी खुल्या प्रवर्गातील विद्यार्थ्यांना रु. १००० तर मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना रु. १००० इतके शुल्क करण्यात येईल. अधिक माहितीसाठी सांगोला महाविद्यालयाच्या संगणक विभागाशी संपर्क साधावा. फार्म भरण्याची सोय रुम.नं.ऊ११ मध्ये सांगोला महाविद्यालय, संगणक विभागामध्ये केलेली आहे.

निर्भिड व सडेतोड बातम्या
नियमित वाचा...
साप्ताहिक माणदेश वार्ता

## देशात विकासाची गंगा पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या काळात सुरु झाली : मकरंद देशपांडे

### सांगोल्यात भाजपचे बूथ संमेलन संपन्न




सांगोला : भारतीय जनता पक्षाचे संघटन मजबूत करण्यासाठी प्रत्येकाला जबाबदारीने आणि नियोजनबध्द काम करणे आवश्यक आहे. इतर पक्षाप्रमाणे भारतीय जनता पक्षात घराणेशाही नाही. नेत्यांपासून ते सामान्य कार्यकर्त्यांच्या अडचणी फक्त भाजपमध्ये जाणून घेतल्या जातात. भाजप हा कार्यकर्त्यांचा विचार करणारा पक्ष आहे. भाजपच्या विद्यमान खासदारांनी शेती, रस्त्यांचा प्रश्न सोडविण्यासाठी अथक परिश्रम घेतले आहेत. राज्यात जातीपातीत भांडणे लावण्याचे उद्योग विरोधक करीत आहेत. भाजप जिल्हाध्यक्षांनी जिल्ह्यात भाजपचे संघटन मजबूत केले असून याचा फायदा लोकसभा निवडणुकीत होणार आहे. येणाऱ्या लोकसभा निवडणुकीत भाजपच्या कार्यकर्त्यांनी तयारीला लागावे. मोदी सरकारच्या योजनांची माहिती प्रत्येक जनतेपर्यंत पोहोचवावी. देशात विकासाची गंगा पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या काळात सुरू झाली असल्याचे मत भाजपचे पश्चिम महाराष्ट्र संघटन मंत्री मकरंद देशपांडे यांनी व्यक्त केले. सांगोल्यात भाजपचे बूथ संमेलन संपन्न झाले.

यावेळी पश्चिम महाराष्ट्र सघंटन मंत्री मकरंद देशपांडे, पश्चिम महाराष्ट्र विभाग बूथ संयोजक योगेश बाचल, भाजपचे जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार सावंत, जिल्हा सरचिटणीस सचिन शिंदे, तालुकाध्यक्ष अतुल पवार, दुर्योधन हिप्परकर, संभाजी आलदर, माढा विस्तारक अनंत राऊत, सांगोला विस्तारक हणमंत करचे, शिवाजीराव गायकवाड, एन.वाय. भोसले, नवनाथ पवार, वसंत सुपेकर, दिलीप सावंत, संजय गंभीरे, आनंद फाटे यांच्यासह भाजपचे सुपर वॉरियर्स, बूथ प्रमुख, शक्ती केंद्र प्रमुख उपस्थित होते. यावेळी महाराष्ट्र विभाग बूथ संयोजक योगेश बाचल यांनी बूथ प्रमुख, शक्ती केंद्र प्रमुख, सुपर वॉरियर्स यांना मार्गदर्शन केले.

यावेळी जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार-सावंत म्हणाले, भारतीय जनता पक्ष हा कार्यकर्ता जपणारा पक्ष असून पक्षात पक्ष संघटनेला महत्त्व आहे. देशात भाजपने सर्वत्र मिळवलेल्या विजयाचे श्रेय आपल्या संघटनात आहे. प्रत्येक गावापर्यंत जाऊन तळागाळातील कार्यकर्त्यांपर्यंत पोहोचून केलेले मजबूत संघटन हीच भाजपची ताकद आहे. तिसरी बार मोदी सरकार,अब की बार ४०० पारसाठी भाजपच्या कार्यकर्त्यांनी तयारीला लागावे. कार्यकर्त्यांच्या बळावरच लोकसभेला पुन्हा आपण ताकद दाखवू, असा विश्वास भाजपचे जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार-सावंत यांनी व्यक्त केला.

# फॅबटेक इंजिनिअरिंगला मनॅकफचे ए मानांकन; गुणवत्तेची परंपरा कायम राखल्याचा मान- भाऊसाहेब रुपनर

सांगोला : येथील फॅबटेक एज्युकेशन सोसायटी संचलित फॅबटेक टेक्निकल कॅम्पस कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग ला देशातील शैक्षणिक क्षेत्रात महत्वपूर्ण असलेले 'नॅक' अर्थात 'नॅशनल असेसमेंट अँड ॲक्रिडिटेशन कौन्सिल' चे 'ए ' हे मानांकन मिळाले आहे., अशी माहिती इंजिनिअरिंग कॉलेजचे प्राचार्य डॉ. रविंद्र शेंडगे यांनी दिली.

'नॅक'च्या प्रक्रियेचा भाग म्हणून महाविद्यालयाने पूर्वी एसएसआर (सेल्फ स्टडी रिपोर्ट) 'नॅक' कडे जमा केलेला होता. त्यानंतर महाविद्यालयाने पुरवलेल्या माहितीची पडताळणी झाल्यानंतर दि. ११ व १२ मार्च २०२४ या दोन दिवशी 'नॅक'च्या त्रिसदस्यीय समितीने महाविद्यालयास प्रत्यक्ष भेट देऊन महाविद्यालयातील सर्व भौतिक सुविधा, अध्ययनअध्यापन पद्धती, विद्यार्थी पूरक सुविधा, महाविद्यालयाची शैक्षणिक उद्दीष्टे, अभ्यासक्रमाचा दर्जा व त्याची अंमलबजावणी, विद्यार्थ्यांची गुणवत्ता, शिक्षकांची गुणवत्ता, शैक्षणिक व पायाभूत सुविधा, कॅम्पस प्लेसमेंट, संशोधन तसेच यापूर्वी मिळालेल्या मानांकनापासून ते आतापर्यंत महाविद्यालयाने केलेली प्रगती व इतर महत्वपूर्ण बाबींची शहानिशा करून आपला अहवाल 'नॅक' कडे सादर केलेला होता. नॅक चे हे मानांकन मिळाल्यामुळे फॅबटेकच्या शिक्षणाच्या दर्जावर पुन्हा एकदा शिक्कामोर्तब झाले आहे. 'नॅक' ही शैक्षणिक संस्थांना मानांकन देणारी देशातील स्वायत्त संस्था असून 'नॅक'चे मानांकन असणाऱ्या शिक्षण संस्थांना एक वेगळी ओळख प्राप्त होत असते. या मानांकनामुळे विद्यार्थी, पालक, नोकऱ्या देणाऱ्या कंपन्या व इतर समाज घटकांना येथील शिक्षणाच्या उच्च दर्जाबाबत खात्री मिळत असते. या मानांकनामुळे महाविद्यालयाला एक उच्च दर्जाचे गुणवत्ता प्रमाणपत्र मिळाल्याने, महाविद्यालयास विविध संस्थाकडून अधिक संशोधन निधी मिळण्यास मदत होईल.



या यशाबद्दल संस्थेचे चेअरमन श्री.भाऊसाहेब रुपनर, मॅनेजिंग डायरेक्टर डॉ.अमित रुपनर, कार्यकारी संचालक श्री.दिनेश रुपनर, कॅम्पस डायरेक्टर डॉ.संजय अदाटे, संचालक डॉ.डी.एस.बाडकर यांनी या मानांकनाबद्दल प्राचार्य, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, सर्व विद्यार्थी यांचे अभिनंदन केले.

ग्रामीण भागातील फॅबटेक महाविद्यालयाने गुणवत्तेची परंपरा कायम राखली आहे.

यापुढील काळात संस्थेच्या सर्वच महाविद्यालयांचे मानांकन उंचाविण्यासाठी गुणवत्ता वाढीवर अधिक भर दिला जाईल असे चेअरमन श्री भाऊसाहेब रुपनर यांनी सांगितले.

'नॅक'चे 'ए' मानांकन हे महाविद्यालयाच्या उज्ज्वल परंपरेला साजेसे आहे. महाविद्यालयातील सर्व घटकांनी विशेष मेहनत घेतली.त्याचे हे फळ आहे. यापुढील काळात शैक्षणिक गुणवत्ता आणि दर्जा कायम राखण्यास कायम कटिबद्ध आहे. – असे मॅनेजिंग डायरेक्टर डॉ. अमित रुपनर यांनी सांगितले.

# घरटी बांधून सांगोल्यात जागतिक चिमणी दिन साजरा



सांगोला : जागतिक चिमणी दिनानिमित्त सांगोला येथील आम्ही प्राणी पक्षी ग्रुप च्या वतीने पक्षांसाठी घरटी व पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात आली. सांगोला शहरातील भोपळे रोड वरील राष्ट्रमाता जिजामाता उद्यानात बुधवारी जागतिक चिमणी दिनानिमित्त पक्षांसाठी घरटे व त्यांना पिण्याचे पाण्याची व्यवस्था करून हा दिन उत्साहाने साजरा करण्यात आला.

उन्हाळ्यात पक्षी पाण्यासाठी आणि खाद्यासाठी भटकत असतात. त्यांची उन्हाळ्यात सोय करून पक्षांप्रती आपले प्रेम जपावे असे आवाहन प्रा. डॉ. विधीन कांबळे यांनी यावेळी केले. त्याचबरोबर ज्यांना पक्षांसाठी घरटे हवी असतील त्यांनी संपर्क साधावा असेही आवाहन केले आहे.

यावेळी प्रा. डॉ. विधिन कांबळे , डॉ. श्रीकांत सुर्वे, राजेंद्र यादव, इंजि. विकास देशपांडे, डॉ. प्रकाश बनसोडे, अरविंद डोंबे, किरण महाजन, संतोष महिमकर, चैतन्य कांबळे, संदेश पलसे, सचिन बुरांडे, नंदकुमार देशपांडे आदी उपस्थित होते.

# सांगोला तालुक्यात नव्याने १८ तलाठ्यांची नियुक्ती : तहसीलदार संतोष कणसे

सांगोला : सांगोला तालुक्यात नव्याने १८ तलाठ्यांची नियुक्ती झाली असून त्यापैकी १३ तलाठी हजर झाल्याची माहिती तहसीलदार संतोष कणसे यांनी दिली.२०२३ मध्ये शासनाने सरळ सेवा भरतीने तलाठी पदाची परीक्षा घेतली होती. त्यातून निवड झालेल्यापैकी १८ नवीन तलाठी सांगोला तालुक्याला मिळाले आहेत. तलाठी व त्यांचे सज्जाचे ठिकाण पुढीलप्रमाणे आहे– श्री. प्रथमेश दत्तात्रय बाबर ( मेथवडे ता. सांगोला ),श्री. व्दिगविजय विजय पाटील (आगलावेवाडी ता. सांगोला), श्री. विशाल भावराव जाधव (सांगोला–१ ता. सांगोला), श्रीम. नेहा दिलीप राऊत ( अचकदाणी ता. सांगोला), श्री. विजय महारुद्र कुडले (वाढेगांव ता. सांगोला ), श्री. निखील मारुती शिंदे ( वाटंबरे ता. सांगोला), श्री. रोहित राजाराम बसवाडे (बलवडी ता. सांगोला), श्री. लिंगराज विठोबा अलदर (चोपडी ता. सांगोला), श्रीम. स्नेहल नथाजी पाटील ( डिकसळ ता. सांगोला), श्रीम. अदिती दत्तात्रय पाटील ( खवासपुर ता. सांगोला), श्रीम. मर्रजिना सहभुसेन इनामदार (कडलास ता. सांगोला ), श्रीम. प्रगती प्रभाकर माळी (वाकी घेरडी ता. सांगोला), श्रीम.अश्विनी बाबुराव कांबळे (जवळा ता. सांगोला), श्रीम. सोफीया एकुब पठाण (कटफळ ता. सांगोला), श्रीम. कोमल नामदेव दाऊंद ( तिप्पेहाळी ता. सांगोला),श्रीम. मयुरी दिलीप साळुंखे (कराडवाडी, कोंबडवाडी ता. सांगोला ),श्रीम. अर्चना शामराव सांगोलकर ( जुनोनी ता. सांगोला), श्री. गौरव शशिकांत कुंभार (सांगोला–२ ता. सांगोला ) यांची नेमणूक झाली असून यापैकी १३ तलाठी हजर झाले आहेत.

# जिल्ह्यातील दुय्यम निबंधक कार्यालय सुट्ट्यांच्या दिवशी राहणार सुरु

सोलापूर : दर वर्षी १ एप्रिलला बाजारमुल्य दर तक्ते प्रसिध्द होत असल्याने. मार्च महिन्यात सर्व दुय्यमनिबंधक कार्यालयात दस्त नोंदणीसाठी पक्षकारांची गर्दी असते. तसेच अर्थिक वर्ष २०२३–२०२४ या वर्षाचा इष्टांक पूर्ण करण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र मुद्रांक शुल्क (अभय योजना) या संबधीचे कामकाज करण्यासासाठी व दस्त नोंदणसाठी दुय्यम निबंधक कार्यालयात पक्षकारांची गर्दी वाढत आहे. त्यामुळे पक्षकारांच्या सोयीसाठी सोलापूर जिल्ह्यातील मुद्रांक जिल्हाधिकारी कार्यालय व सर्व दुय्यम निबंधक कार्यालये दि.२३ मार्च व २४ मार्च २०२४ तसेच दि.२९ मार्च ते ३१ मार्च २०२४ या शासकीय सुट्ट्यांच्या दिवशी दिवशी सुरू ठेवण्यात येणार असल्याचे सह जिल्हा निबंधक तथा मुद्रांक जिल्हाधिकारी ,सोलापूर यांनी पत्रकान्वये कळविले आहे.

# धैर्यशील मोहिते पाटील यांच्याकडून जवळा येथे दिपकआबा साळुंखे-पाटील यांच्या निवासस्थानी भेट



सांगोला : सध्या सांगोला तालुक्याच्या दौऱ्यावर असलेल्या धैर्यशील मोहिते पाटील यांनी बुधवार दि २० मार्च रोजी जवळा ता सांगोला येथील राष्ट्रवादी कॉंग्रेसचे जिल्हाध्यक्ष मा. आम. दिपकआबा साळुंखे पाटील यांच्या निवासस्थानी (पाटील वाड्याला) भेट दिली. यावेळी त्यांनी दिपकआबांचे वडील स्व. आमदार काकासाहेब साळुंखे पाटील व दिवंगत मातोश्री ह.भ. प. स्व शारदादेवी (काकी) साळुंखे पाटील यांच्या प्रतिमेला अभिवादन केले.

यावेळी सौ.रूपमती दिपकराव साळुंखे पाटील यांच्यासह माजी उपसरपंच बाळासाहेब इमडे ,उपसरपंच नवाज खलिफा,अनिल सुतार, प्रशांत साळुंखे पाटील,मनोज धुमाळ,प्रशांत पाटील,संजय पाटील व इतर मान्यवर उपस्थित होते.

अकलूजचे मोहिते पाटील आणि जवळा येथील साळुंखे पाटील परिवाराचे गेल्या अनेक पिढ्यांपासून अतूट संबंध आहेत. गेल्या काही वर्षांपासून मोहिते पाटील व साळुंखे पाटील परिवाराच्या राजकीय भूमिका वेगळ्या असल्या तरीही दोन्ही कुटुंबाने परस्परातील ऋणानुबंध मात्र कायम जपले आहेत. धैर्यशील मोहिते पाटील यांनी या भेटीवेळी दोन्ही परिवाराचे राजकारणाच्या पलीकडील ऋणानुबंध असल्याचे सांगितले. सध्या मोहिते पाटील आणि साळुंखे पाटील या दोन्ही परिवाराच्या राजकीय भूमिका वेगळ्या असल्या तरीही दोन परिवार नेहमीच एकमेकांच्या सुखदुःखात सहभागी असतात असेही यावेळी धैर्यशील मोहिते पाटील यांनी आवर्जून नमूद केले.


